सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक:- एचएमआर-१६२१/सी.आर.४८/२०२१/छाननी दिनांक- ०९ मे, २०२३

# -:प्रसिध्दीपत्रक:-

विषय- सहायक सरकारी अभियोक्ता, गट-अ, (जाहिरात क्रमांक ००१/२०२२)
अनुभव प्रमाणपत्रे सादर करण्याबाबत

महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागांतर्गत सहायक सरकारी अभियोक्ता गट-अ या संवर्गातील ५४७ पदांकरीता दिनांक ०७ जानेवारी, २०२२ रोजी आयोगाकडून जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या चाळणी परीक्षेमधून अर्हता प्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या अर्जांची व प्रमाणपत्रांची छाननी करण्यात येत आहे.

२. सहायक सरकारी अभियोक्ता गट-अ पदाच्या जाहिरातीमध्ये परि. क्र.८.२(एक) मध्ये अनुभवाची तरतुद खालीलप्रमाणे आहे. :-

"Possess experience of working as an advocate in the High Court or in a Court Subordinate thereto, for a period of not less than five years"

उपरोक्त अनुभवाची तरतुद विचारात घेता उमेदवारांनी मा. न्यायालयातील सक्षम प्राधिका-यांनी दिलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे, परंतु बऱ्याच उमेदवारांनी बार असोसिएशनने दिलेल्या प्रमाणपत्रांच्या प्रती अनुभव प्रमाणपत्र म्हणून सादर केल्या असल्याचे निदर्शनास आले आहे.

३. प्रस्तुत पदासाठी छाननीअंती जे उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरतील, अशा उमेदवारांनी मा. उच्च न्यायालयामध्ये किंवा दुय्यम न्यायालयाचे वकील म्हणून प्रत्यक्ष काम केल्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र संबंधित न्यायालयाच्या सक्षम प्राधिकाऱ्यांकडून प्रमाणित करुन विहित नमुन्यात मुलाखतीच्या दिवशी सादर करणे आवश्यक राहील.

४. प्रस्तुत पदाचा मुलाखत कार्यक्रम स्वतंत्ररित्या लवकरच आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

ठिकाण :- नवी मुंबई

उप सचिव (सरळसेवा छाननी)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग